## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

बाबा आहेत माझे थोर धुन सांगतात गोड
अर्थ फार व्यापकता महान
काया वाचा माझे मन
रंगो बाबा धुन करण्यात
होवो बाबांशी मी एकरुप ॥ धृ ॥

पाणी आणि दूध आहे एकजीव मिश्रण
नाही ताक ते तर दूध आहे हो निर्मळ
जुळो नाते असे बाबा आणि माझे अतुट
बाबा कोण मी कोण
नतमस्तक माझे मीपण
केले बाबांचरणी अर्पण ,झाले हो मी निर्धास्त पूर्ण ॥ 1 ॥

बाबांचे हो प्रेम आहे चातकासमान
आहे ओढ पावसाची भक्तदर्शनाची
धन्य बाबा घेऊन दर्शन भोळया भक्तगण
धन्य भक्त घेऊन दर्शन बाबांचे अमुल्य
उभी पाने झाडे हासती हो थक्क होऊन जाती
विसरती देहभान
पाहुन नाते हो दुर्मिळ
भक्त आणि बाबा एक
झाला गोड हा समन्वय ॥ 2 ॥

बाबा सतत विनंती करते होऊन लहान
नको हो गर्वाचा स्पर्श लिहिता बाबा धून
राहो सतत मला जाण बाबा कर्तव्य महान
नको विसर गुरु वचन
नीत रहो बाबा चिंतन
डोळे मिटून ते ध्यान
बाबा आणि मी अनंतात ॥ 3 ॥

★★★★★